**उमा बॅरेज मध्यम प्रकल्प ता. मुर्तिजापुर, जि. अकोला या योजनेस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**

**महामंडळ निर्णय क्र. : १४५/विपाविम/कातां-७(२)/(धा.क्र.८/२०२०)/उमा बॅरेज मध्यम प्रकल्प /व्दितीय सुप्रमा/२०२३, दिनांक : २१.०७.२०२३**

**संदर्भ :-**
१. वि.पा.वि.म., नागपूर प्रथम सु.प्र.मा. आदेश क्र.विपाविम/कांतां.७/२७०३, दि.३१/०३/२०११
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/१५)/जसं(आ), दि.०९.०९.२०१५.
३. अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस (१)/(कक्ष-१(मु)/उमा बॅरेज/(धा. क्र. ५०/२०२०)/२०५/२०२२, दिनांक १०/०३/२०२२
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२२/०८/२०२२ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.बैठक-२०२२/(१४०/२०२२)/ लपा, दि. १४/०९/२०२२.
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ रोजी संपन्न ८३व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.८३/२९

**प्रस्तावना :**

उमा बॅरेज मध्यम प्रकल्प, हा अकोला जिल्ह्यातील तापी खो-यातील पुर्णा उपखो-यात मुर्तिजापूर तालुक्यातील मौजे बोर्टा गावाजवळ उमा नदीवर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्प अकोला जिल्ह्यातील खारपाण पट्टयातील असून हा प्रकल्प अमरावती विभागातील पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियोजित प्रकल्पांपैकी आहे. सदर प्रकल्पामुळे अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर तालुक्यातील २१ गावांमधील ५५१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

उमा बॅरेज मध्यम प्रकल्प, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला या प्रकल्पास महामंडळाचा निर्णय क्र.विपाविम का.तां.५/२८२३/२००७, दिनांक ३१.०८.२००७ अन्वये अंदाजित खर्च रु.७८.६१ कोटी (दरसूची सन २००७-०८ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/का.तां.७/२७०३/सुप्रमा/(३/२०११)२०११, दिनांक ३१.३.२०११ अन्वये रु.२३७.२३५९ कोटी (दरसूची सन २००९-१० वर आधारित) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

बांधकामाचे दरम्यान प्रकल्पाचे खर्चात दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ, भूसंपादन व पुनर्वसन खर्चातील वाढ इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्याने द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

उमा बॅरेज मध्यम प्रकल्प, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला प्रकल्पाचा द्वितीय सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यतांत्रिक सल्लागार समिती (१), नाशिक यांचे दिनांक २३.०८.२०२१ रोजीच्या १६४ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र.३ नुसार प्राप्त झालेला आहे.

उमा बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या व्दितीय सुप्रमा प्रस्तावावर दिनांक २२.०८.२०२२ रोजी संपन्न झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा झाली.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९/०६/२०२३ रोजी संपन्न नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र.८३/२९ नुसार उमा बॅरेज मध्यम प्रकल्प, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला या योजनेचा रू. ७०७.३६ कोटी अंदाजित किंमतीच्या व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती तपासणी अहवालातील मुद्या क्र.२६ व २७ ची पुर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे राज्य तांत्रिक सल्लागार समितीने विहित केलेल्या कालावधीत